

ज्ञान - विज्ञान विमुक्तये

विद्यापीठ अनुदान आयोग
आणि
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित,
दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

२७ व २८ जानेवारी २०१७

# भाषा, समाज आणि समकालीन मराठी साहित्य

## स्मरणिका




मार्गदर्शक
प्राचार्य डॉ. अशोकराव मोहेकर

संपादक
डॉ. दादाराव गुंडरे

सहसंपादक
प्रा. दीपक सूर्यवंशी
डॉ. केदार काळवणे


Scanned by CamScanner

११. चिखलवाटा : शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वास्तव चित्रण करणारी ग्रामीण कादंबरी ७०
*प्रा. संगीता दत्ताजी मोरे*

१२. समकालीन राजकीय सत्ता संघर्षाचा वेध घेणारी कादंबरी : आमदार सौभाग्यवती ७६
*प्रा. यशवंत आश्रुबा हाके*

१३. अंतरिता : एक परीक्षण ८१
*प्रा. क्षीरसागर प्रशांत ब.*

१४. समकालीन मराठी कादंबरी ८५
*प्रा. संदिप परदेशी*

१५. समकालीन ग्रामीण साहित्य ९०
*प्रा. लहूकुमार खंडाळे*

१६. समकालीन ग्रामीण कथा व समाजवास्तव एक आलेख ९६
*प्रा. जाधवर शशिकांत श्रीरंग*

१७. समकालीन मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री : एक आकलन १०६
*डॉ. शेटकार रामशेट्टी राजेंद्र व प्रा. मुदगडे जगन रघुनाथ*

१८. मराठी कवितेतील कृषी जीवन ११८
*प्रल्हाद दत्तराव भोपे*

१९. समकालीन ग्रामीण साहित्य : प्रेरणा व स्वरूप १२६
*प्रा. दीपक सूर्यवंशी*

२०. ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप १३२
*श्री पवार एस. जे.*

२१. मराठी ग्रामीण कादंबरीत घडणारे स्त्रीवादाचे दर्शन १३६
*श्री अविनाश ताटे*

२२. समकालीन दलित साहित्य आणि आंबेडकरवादी रंगभूमी १४२
*प्रा. डॉ. संदीप अ. बनसोडे*

२३. दलित कादंबरीचे निराळेपण १४९
*डॉ. शंकर वाघमारे*





२४. मराठी कवितेच्या परंपरेत समकालीन कविता १५३
*प्रा. महारुद्र जगताप*

२५. समकालीन काव्य : ग्रामगीतेची उपयुक्तता १६३
*प्रा. डॉ. राजकुमार यल्लावाड व प्रा. डॉ. तुळशीराम उकिरडे*

२६. दलित काव्यातील स्त्री मनाची वेदना १७६
*प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने*


**स्त्रीवादी व आदिवासी साहित्याचे आविष्करण**


२७. अनुराधा पाटलांची समकालीन मराठी कविता १८३
*प्रा. शिवाजी सिरसाठ*

२८. स्त्री मनाची अनेकविध रूपे आविष्कृत करणारी डॉ. वृषाली किन्हाळकरांची कविता १८९
*डॉ. चत्रभुज नारायण सोळूंके*

२९. समकालीन आंबेडकरी कवयित्रींच्या कवितेतील स्त्रीजाणिवा १९३
*प्रा. डॉ. लहू दिगंबर वाघमारे*

३०. स्त्रीकोष : समकालीन स्त्री जाणीवेचा अविष्कार २०२
*प्रा. सौ. अर्चना कुलकर्णी / बावीकर*

३१. रावजी राठोड यांच्या साहित्यातील गोर समाज आणि भाषा २०८
*डॉ. गजानन पांडूरंग जाधव*

३२. कोळवाडा : महादेव कोळी समाज जीवनाचा आरसा २१३
*डॉ. खोडेवाड डी. पी.*

३३. समकालीन आदिवासी साहित्य २१८
*प्रा. डॉ. लक्ष्मण गिते*

३४. जावे तिच्या वंशा - प्रिया तेंडूलकर २२२
*प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे*




Scanned by CamScanner

# समकालीन दलित साहित्य आणि आंबेडकरवादी रंगभूमी

प्रा. डॉ. संदीप अ. बनसोडे
र. भ. अट्टल महाविद्यालय
ता. गेवराई, जि. बीड

आंबेडकरवादी रंगभूमी अभ्यासत असताना प्रथम तर आंबेडकरवादी रंगभूमी जी आज दलित रंगभूमी म्हणून ओळखली जाते या रंगभूमीवर कोणत्या रंगभूमीचा किंवा कोणत्या नाटककराचा प्रभाव आहे हे शोधणे महत्त्वाचे ठरते. मग हा शोध शेवटी प्रथम नाटककराजवळ येऊन थांबतो आणि लक्षात येते की, महात्मा जोतीराव फुले हे महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाचे पायाभूत काम करणारे तत्वज्ञ सुधारक आहेत. १८५५ साली त्यांनी 'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहिले. त्या काळातले मराठी नाटक पौराणिक स्वरुपाचे रंजनप्रधान नाटक होते. ग्रामीण भागात तमाशाची रंगभूमी अधिक लोकप्रिय होती. अशा काळात धर्मांच्या नावावर सर्वसामान्य माणसांचे शोषण कसे चालू आहे हे आशयसूत्र डोळ्यासमोर ठेवून म.फुले यांनी हे नाटक लिहिले या नाटकासाठी म.फुले यांनी ना पौराणिक नाटकाचे तंत्र वापरले ना तमाशा रंगभूमीचे. महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाचे मानस आणि 'स्व'तंत्र पध्दतीने लिहिलेले 'तृतीय रत्न' हे नाटक आधुनिक मराठी रंगभूमीचा आरंभ आहे आणि म्हणून या न्यायाने प्रथम नाटककार म्हणून म.फुले यांचाच उल्लेख मराठी नाट्यवाङ्मयामध्येही येणे आवश्यक आहे.[१]

म.फुले यांची वैचारिक मांडणी, विचार सूत्राशी सुसंगत ठरेल असा सुधारणेचा कार्यक्रम आणि त्यांच्या कृतीउक्तीचे केंद्र असलेला शुद्रातिशूद्र यामुळे म.फुले यांची चिंतनयात्रा बाबासाहेबांपर्यंत येऊन पोचली होती. त्या काळी चालत असलेल्या तमाशाची मोडतोड करत, त्यातील अविष्कार पध्दतीत फेरफार करत नवा आधुनिक तत्त्वज्ञानाचा प्रकाश सोबतीला घेत तमाशाचे जलशात रुपांतर झाले. आजही जलसे पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नाहीत मात्र भीमराव कर्डक यांच्या 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' या जलशाकडे पाहिल्यानंतर प्रभावी शस्त्र म्हणून जलशा किती महत्त्वाचा होता हे लक्षात येते. आजच्या आंबेडकरवादी रंगभूमीचा या 'जलशा'शी प्रत्यक्ष सांधा नसला तरी सादरीकरणाच्या संदर्भात 'जलशा' हे दलित रंगभूमीचे आरंभीचे रुप आहे असे आपणास म्हणता येईल.

नंतरच्या काळात अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या तमाशातल्या 'वगनाट्यात' बेमालुमपणे लाल रंग मिसळला. अशाप्रकारे १९०० ते १९६० हा कालखंड आंबेडकरवादी रंगभूमीचाच पहिला कालखंड म्हणून शाहिर आणि जलसेकारांनी गाजवला, 'शेटजींचे इलेक्शन' या अण्णाभाऊंच्या वगनाट्यातून आंबेडकरी रंगभूमीचे स्वरुप त्यावेळी कसे होते हे आपल्या लक्षात येते.

स्वातंत्र्यानंतर जलसा थांबला दलितांच्या पहिल्या पिढीने शिक्षित होऊन १९५२ व १९५७ च्या दोन निवडणूकांना पार केले. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे निर्वाण झाले आणि आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेची पाहिजे तशी अंमलबजावणी राज्यकर्त्याकडून न झाल्याने स्वप्नांचा चक्काचूर झाला, मग पुन्हा एकदा आंबेडकरी विचार हे पथदर्शक होवून दलित शिक्षितांना भानावर आणण्याचे काम करु लागले, दलित वर्ग १९५०-१९६० च्या काळातील झालेल्या अपेक्षाभंगाने सरसावला. त्यातच महाविद्यालयातील शिक्षणामुळे आणि सभोवतालच्या बदलत्या रंगमंचीय वातावरणामुळे अभिव्यक्ती पध्दतीचे नवे तंत्र दलित लेखकांना अवगत झाले. आणि १९६० च्या दरम्यान दुसऱ्या टप्प्यावर जी दलित रंगभूमी राहिली त्यात प्रा.दत्ता भगत आणि प्रेमानंद गज्वी हे दोन महत्त्वाचे लेखक उदयाला आले. 'जहाज फुटलं आहे' या एकांकिकेत शोषितांच्या बेकारीचा प्रश्न उग्र स्वरुपात प्रकट झालेला आहे. आणि शोषित जातीच परस्परात भांडून आपल्या शक्तीचा नाश करत आहेत याचे भेदक दर्शन घडते. तर राज्यघटनेने जन्माच्या आधारावर कुणीही कोणाला हीन लेखू नये याची

कायदेशीर व्यवस्था केली. पण जी तरतूद कायद्याने केली तो कायदा पाळावा याची मानसिकता समाजात कशी निर्माण होईल याची कोणतीही व्यवस्था न केल्यामुळे नवशिक्षित दलित गुदमरुन गेला. त्याचा विलक्षण कोंडमारा सुरु झाला. नवशिक्षिक दलितांचा हा कोंडमारा 'घोटभर पाणी' या एकांकिकेत भेदक स्वरुपात प्रकट झाला. पुढे 'किरवंत' नावाचे नाटक लिहून जन्म दलित्वाच्या वेदनेचा एका वेगळ्या पातळीवर त्यांनी विस्तार केला आहे.

जन्मदलितांच्या वाट्याला येणारे दुःख किती वेगळ्या स्वरुपाचे आहे हे एकाचवेळी महाराष्ट्रातल्या सर्वच नगरांमधुन जे लेखन सुरु झाले आणि दलित रंगभूमीची जी चळवळ सुरु झाली त्यामुळे आपल्याला कळू शकते. एखाद्या मुलीला खंडोबाबरोबर लग्न करावे लागणे आणि अनेकांबरोबर आलेल्या संबंधातून तिला मुलगी झाल्यास पुन्हा त्या मुलीचे लग्न खंडोबाबरोबर व्हावे! म्हणजे बाप म्हणवणाराने पुन्हा आपल्या मुलीबरोबर लग्न करावे आणि धर्माने पुन्हा या सर्व गोष्टींना पवित्र मानावे! एखाद्या मुरळीच्या मनातला हा उद्‌गार प्रथम दलित प्रतिभेलाच ऐकू आला. रामनाथ चव्हाण यांच्या 'बायको मी देवाची' या दलित एकांकात ही वेदना मुखर होते.

इ.स.१९५० साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली. त्यावेळी रुजू झालेले प्रचंड व्यासंगी असणारे प्राचार्य म.भी.चिटणीस हे महाविद्यालयाच्या होणाऱ्या स्नेहसंमेलनात मराठी रंगभूमीवर लोकप्रिय असणारी रंजक नाटके बसवून घेत. मात्र एकदा डॉ.बाबासाहेबांनी या नाटकांबद्दल असमाधान व्यक्त केले. म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेला अनुसरुन प्राचार्य चिटणीस यांनी 'युगयात्रा' हे नाटक लिहिले. या नाटकाचा प्रयोग संबोधी ग्रुपने केला. स्वतः बाबासाहेबांनी हा प्रयोग पाहिला आणि समाधान व्यक्त केले. याच नाटकाचा १९५६ साली नागपूर येथे प्रयोग झाला. धर्मांतरासाठी जमलेल्या लाखो दलित बांधवानी हा प्रयोग आंबेडकरी प्रेरणेचे आणि नव्या तंत्रातले मराठी नाटक कसे असू शकेल याचा जणू एक प्रकारचा संदेशच या नाटकाने दिला असे म्हणता येईल.



मुळात नागपूरची भूमी ही 'पथनाट्या'साठी प्रसिद्ध होती. या पथनाट्यात कामे करणारी श्रमीकांची मुले असली तरी ती जन्माने दलितच होती. जीवन उजळून टाकणारी १९५६ सालची धम्म चक्र प्रवर्तनाची घटना, पथनाट्याच्या अंगाने दमदारपणे विस्तारत गेली. अमर रामटेके, इ.मो.नारनवरे, अशोक बुरबुरे, प्रभाकर दुपारे, सुनिल रामटेके अशी तरुण मंडळी या काळात पुढे आली आणि रंगभूमीच्या संदर्भात नवनवीन प्रयोग करु लागली. 'जयक्रांती' हे प्रभाकर दुपारे यांचे पथनाट्य अशाच पथनाट्याचा एक प्रातिनिधिक नमूना आहे. या काळात आंबेडकरी प्रेरणेने भारावलेल्यांनी ज्या ज्या पद्धतीने भाग घेता येईल त्या त्या पद्धतीने भाग घेतल्याचे दिसून येते. म्हणजेच रंगभूमीशी कुठल्याही प्रकारचे आकर्षण या मंडळींना नाही तर केवळ चळवळीसाठी रंगभूमी हे आपले शस्त्र आहे असेच या रंगकर्मींना वाटत आले आहे. याच काळात पश्चिम महाराष्ट्रात 'जलसा' व नागपूर विभागाने दुसऱ्या कालखंडात 'पथनाट्य' दिले. तर या सर्वांना या निमित्ताने एकत्र आणण्याचे महत्त्वपूर्ण काम मराठवाड्याने केल्याचे दिसते.

मराठी रंगभूमीची पुणे आणि मुंबई ही दोन महत्त्वाची केंद्रे होती. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मिती नंतर महाराष्ट्र शासनाने राज्य नाट्यस्पर्धा सुरु केली. आकाशवाणी केंद्रावरुन नभोनाट्यांचे प्रसारण सुरु झाले. नाटकाचा प्रेक्षक हा अपेक्षेप्रमाणे नागर होता मात्र नभोनाट्याचा श्रोता अगदी दूरवर खेड्यापर्यंत पसरलेला होता. त्यामुळे आंबेडकरी प्रेरणेने भारावलेले भि.शि.शिंदे यांनी 'भूमीपूत्र' हे नभोनाट्य लिहिले. पुढे भि.शि.शिंदे यांच्या 'काळोखाच्या गर्भाने' या नाटकाने इतिहास घडवला. तर नावाजलेले रंगकर्मी टेक्सास गायकवाड यांनी शिंदे यांच्या नाटकाचे दिग्दर्शन केले, दिग्दर्शन करुनच टेक्सास गायकवाड थांबले नाहीत तर त्यांनी पुढे 'मन्वतर' आणि 'आम्ही देशाचे मारेकरी' अशी दोन नाटके लिहिली. दरम्यानच्या काळात औरंगाबाद येथे दलित थिएटरची स्थापना झाली. १९८२ साली निवडक नाटकांच्या महोत्सवाचे उद्‌घाटन निळू फुले यांच्या हस्ते झाले यात प्रकाश त्रिभुवन यांच्या 'थांबा रामराज्य येतयं' या नाटकाचा प्रयोग संमेलनात झाला. नंतर १९८४ साली पहिले अखिल भारतीय दलित



Scanned by CamScanner

नाट्यसंमेलन पुणे येथे आयोजित केले गेले. यावेळी महाराष्ट्रात विविध प्रमुख शहरात दहा नाट्यसंमेलने झाली आणि दलित चळवळीला गती मिळाली.

प्रकाश त्रिभुवन यांच्या 'थांबा रामराज्य येतयं' या नाटकाचा प्रयोग दिल्ली येथे झाला त्यावेळी जागतिक किर्तीचे दिग्दर्शक पीटर ब्रुक हे उपस्थित होते. या नाटकातील पात्रांच्या बॉडी लँग्वेजने जो नाट्याशय पीटर ब्रुक यांच्यापर्यंत पोचवला त्यामुळे ते विलक्षण प्रभावीत झाले. अशा प्रकारे ज्याला आपण दलित किंवा आंबेडकरवादी रंगभूमी म्हणून संबोधू या रंगभूमीच्या सादरीकरणाकडे मात्र पीटर यांच्या प्रतिक्रियांनी जगाचे लक्ष वेधले.

मुंबई म्हणजे उद्योगप्रधान शहर. तेथील परिस्थिती काहीशी वेगळी होती. मराठी नाट्यव्यवहाराचे प्रमुख केंद्र म्हणून मुंबई सर्वांना ज्ञात होती. इथला नाटकांचा व्यवहार प्रेक्षकाश्रयी होता. हा प्रेक्षक मध्यमवर्गीय होता. आणि म्हणून की काय गावकुसाबाहेरच्या वेदनेला मराठी नाटकात मुळीच स्थान नव्हते. अशा वातावरणात प्रेमानंद गज्वी यांच्या लेखनाची सुरवात झाली. व्यावसायिक रंगभूमीबद्दल असमाधानी असणारा एक प्रेक्षकांचा वर्ग मुंबईत होता. अशा या प्रेक्षकांना स्वतःच्या नाटकाकडे खेचुन आणण्याचे काम गज्वी यांच्या नाटकाने केले. जे जे विजय तेंडुलकर यांच्या नजरेतून सुटले, गज्वी यांच्या नाटकांनी नेमके तेच टिपले. त्यामुळे गज्वी यांच्या नाटकाला एक व्यावहारिक यशही प्राप्त झाले. प्रेक्षकातील दलित – दलितेत्तर अंतर गळून पडावे अशीच गज्वी यांची नाटके होती. त्यांच्या 'तनमाजोरी' 'किरवंत' 'गांधी-आंबेडकर' या तीन नाटकांना मराठी रंगभूमीवर मानाचे स्थान मिळाले. त्यांच्या नाटकातील आशयसूत्र दलित चळवळीतील रंगकर्मींना आपलेसे वाटत होते, जे की, चळवळीला पोषक असेच होते. पुढे प्रा.दत्ता भगत यांच्या 'खेळिया' 'वाटापळवाटा' आणि रामनाथ चव्हाण यांच्या 'बामणवाडा' या नाटकांनी दलित दलित्तेतर प्रेक्षकातला दुरावा दूर करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

इ.स.२००० नंतर दलित रंगभूमीवरील कलावंतानी एकत्रीत येऊन विचारविनिमय केला. आता दलित नाट्यसंमेलने दिवसेंदिवस उत्सवी होऊ लागली. मात्र काही रंगकर्मींना हे नकोसे वाटू लागले. म्हणून त्यांनी नाट्य



संमेलनाचे आयोजन बंद करण्याचा निर्णय घेतला. त्या ऐवजी नाट्यवाचनाच्या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. यात प्रामुख्याने प्रेमानंद गज्वी, डॉ.सुरेश मेश्राम आणि अशोक हांडोरे यांनी विशेष प्रयत्न केले. हे सर्व कार्य 'बोधी नाट्य परिषद' या नव्या बॅनरखाली सुरु झाले. याचा परिणाम अवघ्या पाच सहा वर्षांत दिसू लागला नागपूरचे महेंद्र सुके यांचे 'कु.सौ.कांबळे' नाशिक येथील भगवान हिरे यांचे 'साधू' बीड येथील गौतम निकाळजे यांचे 'खेळ' सांगली येथील अरुण मिरजकर यांचे 'निब्बाण' ही नाटके बहुचर्चित ठरली एवढेच नव्हे तर मुंबई येथे बोधी संस्था आयोजित नाट्यमहोत्सवात या नाटकांचे प्रयोग झाले. वसईचे कालकथित सिद्धार्थ तांबे यांचे 'जाता नाही जात' या नाटकाची निर्मिती अविष्कार या संस्थेने केली. आज बोधी चळवळीच्या माध्यमातून आणि प्रयत्नातून किनवट, गडचिरोली, पवनी, चंद्रपूर, चाळीसगाव या सारख्या आदीवासीबहुल गावांमधून नवे लेखक लेखन करीत आहेत. दलित रंगभूमीचा 'विद्रोही' वाटचाल भावीकाळात ज्ञाननिष्ठ व्हायला हवी अशी बोधी नाट्यपरिषदेची भावना आहे.

या परिषदेनेच दोन उत्तम नाटककार आपल्याला दिले आहेत त्यात एक नांदेड येथील तेलंगण सीमेवरच्या किनवट गावात वास्तव्य करुन आहेत. तर दुसरे मुंबई स्थित असलेले 'कोण म्हंतं टक्का दिला' या नाटकाचे लेखक संजय पवार.

आंबेडकरी रंगभूमीशीची काही ठळक वैशिष्ट्ये प्रा.दत्ता भगत यांनी नोंदवली आहेत. ती अशी की या रंगभूमीचे लेखन आंबेडकरी प्रेरणेने भारावलेले आहे. आंबेडकरी विचार हाच येथील रंगकर्मींच्या 'पॉइंट ऑफ व्यू' ची जडण घडण करतो. राज्यघटनेत अंतर्भूत असलेला न्यायसमतेचा वैश्विक विचार या रंगभूमीने आपला आधार म्हणून स्वीकारला आहे. मराठी रंगभूमीवर रुढ असणाऱ्या तंत्राविरुद्ध ही रंगभूमी बंड करुन उठत नाही. या तंत्राचा बडेजाव आंबेडकरी रंगभूमीला मान्य नाही. शक्य असेल तर ही रंगभूमी पारंपरिक तंत्र त्या तंत्रातील सर्व शक्ती पचवून नव्या तंत्राची निर्मितीही करते. 'तमाशा' चे रुपांतर इथे 'जलशा'त झाले आहे त्याचे कारण हेच आहे. मुक्तनाट्य,

एकांकिका आणि नाटक याबद्दलची रचनातंत्रातील काटेकोरता ही रंगभूमी पाळत नाही कारण 'कसे सांगायचे' यापेक्षा 'काय सांगायचे' याबाबत ही रंगभूमी अधिक दक्ष आहे. आणि म्हणून आंबेडकरी रंगभूमीचे भविष्य उज्वल आणि उत्तर रंगभूमीवरच नव्हे तर एकूणच मराठी नाट्यवाङ्मयावर परिणाम करणारे असेच आहे आणि राहिल असे वाटते.


संदर्भग्रंथ :

१. यावाबतचे सविस्तर मत नव्यानेच पुनःप्रकाशीत झालेल्या म.फुले यांच्या 'तृतिय रत्न'या नाटकाच्या सुरवातीला जे मनोगत नांदेड येथे भरलेल्या ७७ व्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रा.दत्ता भगत यांनी व्यक्त केले आहे.

२. मराठी दलित एकांकिका, संपादक दत्ता भगत, साहित्य अकादेमी

३. शेटजींचे इलेक्शन - अण्णाभाऊ साठे (तुकाराम भाऊराव साठे)

४. दत्ता भगत – खेळिया, वाटापळवाटा.

५. प्रेमानंद गज्वी – तनमाजोरी, किरवंत, देवनवरी.

६. रामनाथ चव्हाण - बायको मी देवाची, समाजशास्त्रीय लेखन 'जाती आणि जमाती'

७. ७) प्रभाकर दुपारे - ओंजळभर पाणी, नाटक - रमाई, उत्सव.






# दलित कादंबरीचे निराळेपण


डॉ. शंकर वाघमारे
मराठी विभाग प्रमुख
प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय
नेकनूर जि. बीड


अनेक वर्ष गळयाच्या आत आडकलेल्या आवाजाला बाहेर काढण्याचे काम दलित साहित्याने केल आहे. मराठी साहित्याला विस्तृत करण्याचे काम दलित साहित्याने केले आहे. त्यातून प्रकट होणाऱ्या जीवनानुभवांनी साहित्याला नवी जीवनकक्षा लाभली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन अनेक तरुण लिहू लागले.बोलू लागले आणि त्यातून दलित साहित्याची निर्मीती होऊ लागली. खरे तर आज मराठी साहित्याला दलित साहित्यामुळे गोडी निर्माण झाली आहे. काही काळ असा होता की,दलित लेखकांचे साहित्य हे एकाच समाजाच्या, जातीच्या कोंडीत अडकुन पडले की काय? अशी शंका होती.पण ही कोंडी फुटली आहे. अनेक दलित लेखक आपआपल्या परीने आलेल्या अनूभवाच्या आधारे लेखन करुन दलित साहित्य भक्कम करीत आहेत.

दलित साहित्यात कथा,कादंबरी,कविता,नाटक आत्मचरित्र असे विविध घटक दिसून येतात. कादंबरी हा वाङःमय प्रकार पाश्चिमात्य साहित्यामधुन आला असला तरी, मराठी साहित्यातही तो नानाविध रुपांनी प्रस्थापित झालेला आहे. १९६० नंतर मराठी वाङःमयामध्ये जे अनेक प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये आपल्याला दलित साहित्याचा उल्लेख करणे अत्यावश्यक आहे. दलित कविता आणि कथा या वाङ.मय प्रकारापेक्षा दलित कादंबरी हा वाङ.मय प्रकार दलित लेखकांनीच तितका




Scanned by CamScanner